# आरती श्री दत्तगुरूंची

जय दत्त गुरू दत्त
जय दत्त गुरू दत्त
जय दत्ता गुरू दत्ता अत्रिनंदना
निरांजन ओवाळू आदिनिरंजना
जय दत्त गुरू दत्त
जय दत्त गुरू दत्त ॥धृ.॥

कसे कटी काषाय माथा जटामुकुट
दण्ड कमंडलू हाती शंखचक्रासकट
त्रिशूलगदाधारी षड्भुज द्विपाद
त्रिमुख औदुंबरी प्रसन्न श्रीपाद
जय दत्त गुरू दत्त ॥१॥

सगुण ब्रह्मरूपे ब्रह्मा विष्णु शंकर
एकची रूपे दावी दत्तअवतार
मानवी तरी आगळे बने अनसुयाबाळ
धेनुश्वानासह करी भक्तप्रतिपाळ
जय दत्त गुरू दत्त ॥२॥

स्थापूनी नाथपंथ दावी मोक्षाचा पथ
टिकवूनी परंपरा प्रकटे स्वामी समर्थ
सगुणापसूनी मिळे निर्गुणाची शिकवण
सद्गुरूमुळे जाती भक्तजन उद्धरून
जय दत्त गुरू दत्त ॥३॥

- नारायण
१२/०८/९८

ॐ

औदुंबरवासी दत्तराज महाराज की जय !

अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज

श्री सद्गुरू देव दत्त दत्त दत्त !

श्री स्वामी समर्थ महाराज कि जय !

ॐ

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवोऽमहेश्वर: ।

गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ॥

जय दत्त गुरू दत्त ।